<u>नियमित दिवाणी दावा क्र. २२/२०१६</u>
बाबासो वि. प्रकाश

## <u>निशाण क्र. ४१ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांचे विरुध्द झालेला विनाकैफियत चा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करुन घेणेसाठी दाखल केला आहे. वादीने सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे.

२. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. दाव्याचे समन्स प्राप्त झालेनंतर ते दावेचे कामी हजर झाले परंतु सविस्तर कैफियत देणेसाठी शेतीच्या कामामुळे आवश्यक ती माहिती व कागदपत्रे मुदतीत प्राप्त करता आलेली नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुध्द विनाकैफियत आदेश झाला आहे. सदरचा आदेश रद्द होवून कैफियत दाखल झाल्यास वादीवर अथवा दाव्याच्या गुणदोषावर कोणताही परिणाम होणार नाही उलट न्यायदानास मदतच होणार आहे. प्रतिवादींनी विना कैफियत चा आदेश रद्द करुन त्यांना बाजू मांडण्याची संधी देण्याची विनंती केली आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार वादीने सरतपासाचे शपथप दाखल केले आहे. अर्जात नमूद कारणे विना कैफियत आदेश रद्द होण्यास पुरेसे नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुतचा दावा वादीने दावा मिळकतींचे वाटप होवून पृथ्थक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र. १ व २ हे वकीलामार्फत हजर झाले परंतु त्यांनी वेळेत आपली कैफियत दाखल केली नाही त्यामुळे दिनांक १०/८/२०१६ रोजी त्याचेविरुध्द विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २३/१/२०१९ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादी यानी कैफियत दाखल करण्यास २ वर्षे ५ महिने इतका विलंब केला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ ची कैफियत दावेचे कामी आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामधील मुळ वादाचे निराकरण एकाच दावेचे कामी करणेसाठी प्रतिवादी क्र. १ व २ यांना संधी देणे आवश्यक आहे. मात्र झालेल्या विलंबाबाबत

प्रतिवादीवर खर्च बसवणे यथोचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी यास रक्कम रुपये ५००/— खर्च म्हणून द्यावेत. प्रतिवादींनी खर्चाची रक्कम दिलेनंतर प्रतिवादी यांची कैफियत स्विकृत करण्यात यावी.

( सलीम अ जमादार )
न्यायाधिकारी,
ग्रामन्यायालय, वैभववाडी

दि. १३/२/२०१९